विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक घटकांना विद्युत शुल्क माफी सवलतीचा कालावधी वाढविणेबाबत.

## महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांकः साप्रोयो-२१०९/(प्र.क्र.१४)/उद्योग-८
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- २ मार्च, २००९.

वाचाः- १) ऊर्जा विभागाची अधिसूचना क्र.इएलडी-१०९७/सीआर-२९९४/ऊर्जा-२, दि.१९ मार्च, १९९७.
२) ऊर्जा विभागाची अधिसूचना क्र.ईएलडी-१०९७/सीआर-९४८५/ऊर्जा-१, दि.२८ ऑगस्ट, १९९७.
३) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांकः साप्रोयो- १००४/(प्र.क्र.९६)/ उद्योग-८, दि.२ जुलै, २००४.
४) ऊर्जा विभागाची अधिसूचना क्र.इएलडी-२००४/सीआर-२१३/ऊर्जा-१, दि.७ जुलै, २००४.

**शासन निर्णयः-**

संदर्भाधीन शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांकः साप्रोयो-१००४/(प्र.क्र.९६)/उद्योग-८,दि.२ जुलै,२००४ नुसार गडचिरोली /हिंगोली जिल्ह्यातील आणि मराठवाडा व विदर्भ विभागातील इतर जिल्ह्यतील उद्योगांना, ऊर्जा विभागाच्या दि.७/७/२००४ च्या अधिसूचनेद्वारे देय केलेली विद्युत शुल्क माफीची सवलत अनुक्रमे दि.३१/३/२०१२ व दि.३१/३/२००९ पर्यंत आहे. राज्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, मराठवाडा व विदर्भ विभागाचा औद्योगिक विकास होणे आवश्यक असून तेथील उद्योगांना स्पर्धात्मक युगात टिकून राहण्याकरिता सक्षम करणे आवश्यक आहे.

२. ही बाब विचारात घेवून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, विदर्भ व मराठवाड्यातील सर्व उद्योग घटकांना विद्युत शुल्क माफीची ही सवलत दि.३१/३/२०१४ पर्यंत वाढविण्यात यावी.

३. शासन निर्णयाच्या अमंलबाजावणीसाठी आवश्यक ती अधिसूचना ऊर्जा विभागाकडून तातडीने निर्गमित करण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संहिता क्रमांक २००९०३०२१६२२४५००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( दा.अं.कुलकर्णी )
शासनाचे अवर सचिव

प्रतः-
१) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई,
२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, (ऊर्जा ), मंत्रालय, मुंबई
५) सर्व जिल्हा उद्योग केंद्रांचे महाव्यवस्थापक,
६) सर्व विभागीय आयुक्त,
७) सर्व जिल्हाधिकारी आणि उप उद्योग आयुक्त,
८) सर्व उद्योग सहसंचालक,
९) विक्रीकर आयुक्त, मुंबई

माहितीसाठी प्रत रवानाः-
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,
मा.मंत्री( उद्योग )यांचे खाजगी सचिव,
मा.उद्योग राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,
मा.मुख्यसचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,
प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय,
प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय.
सचिव (ऊर्जा ) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय.